


दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : २०६
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, शनिवार, दि.०८ मार्च २०२५

## थोडक्यात

### मिठाई विक्रेत्यांकडून अन्न व औषध प्रशासनाच्या नियमांना केराची टोपली

अक्षराज : भानुदास गायकवाड

दि.७, डोंबिवली (ठाणे) : डोंबिवली आणि कल्याण परिसरातील काही मिठाई विक्रेत्यांकडून अन्न व औषध प्रशासनाच्य नियमांची सर्रास पायमल्ली केली जात असल्याची माहिती समोर येत आहे. ऑक्टोबर महिन्यात अन्न व औषध प्रशासनाने मिठाई विक्रेत्यांसाठी एक नियम लागू केला होता, ज्याअंतर्गत विक्रीसाठी ठेवलेल्या प्रत्येक मिठाईवर एक्सपायरी डेटचा टॅग लावणे बंधनकारक करण्यात आले होते . यामुळे ग्राहकांना मिठाई किती दिवस खाण्यास योग्य आहे, याची स्पष्ट माहिती मिळू शकते. या नियमामुळे भेसळयुक्त मिठाई विक्रीला आळा बसू शकतो तसेच मिठाईमुळे होणाऱ्या विषबाधेच्या घटनांमध्येही घट होण्याची शक्यता आहे.

मात्र, सणासुदीच्या काळात काही मिठाई विक्रेत्यांकडून या नियमांची सर्रास पायमल्ली होत असल्याचे दिसत आहे. अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांना जणू केराची टोपली दाखवत काही मिठाई विक्रेते प्रशासनाच्या कारवाईला आव्हान देत आहेत. सणासुदीचा हंगाम सुरू असल्याने मिठाईच्या मागणीत मोठी वाढ झाली आहे. याचाच गैरफायदा घेत काही विक्रेते निकृष्ट आणि भेसळयुक्त मिठाई विक्री करण्याची शक्यता नाकारत येत नाही . ग्राहकांच्या आरोग्यासाठी हा गंभीर धोका ठरू शकतो. त्यामुळे अन्न व औषध प्रशासनाने त्वरित कठोर कारवाई करणे गरजेचे आहे.

नियमांचे पालन न करणाऱ्या मिठाई विक्रेत्यांवर दंडात्मक कारवाई करत त्यांना स्पष्ट इशारा देणे आवश्यक आहे. जर त्वरित पावले उचलली नाहीत, तर भविष्यात काही अनुचित घटना घडू शकतात. त्यामुळे प्रशासनाने अधिक काटेकोर तपासणी व कारवाई करत ग्राहकांचे आरोग्य सुरक्षित ठेवण्याच्या दृष्टीने पावले उचलावीत, अशी नागरिकांची मागणी आहे.

### घणसोली विभागात अनधिकृत बांधकामावर धडक कारवाई

अक्षराज : जे. के. पोळ

**दि.०७, नवी मुंबई :** महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या वतीने नोटीस देऊनही संबधितांनी नोटिशीची दखल न घेतल्यामुळे अतिक्रमण विभागाने कोपरखैरणे व घणसोली विभागात निष्कासनाची कारवाई केली. कोपरखैरणे विभाग अंतर्गत १) मारुती डी. कोरगावकर, एसएस टाईप, रूम नंबर २००, सेक्टर १७, कोपरखैरणे, यांच्या बांधकामास दिनांक ०४ मार्च २०२५ रोजी नोटीस बजावण्यात आली होती. सदर बांधकामावर निष्कासनाची कारवाई करण्यात असून, दंडात्मक शुल्क रु.१०,०००/- दंड वसूल करण्यात आला. २) बीरामबोले राजाराम विठोबा, एसएस टाईप, रूम नंबर २०१, सेक्टर १७, कोपरखैरणे, नवी मुंबई यांच्या बांधकामावर निष्कासनाची कारवाई करण्यात असून, दंडात्मक शुल्क रु.१०,०००/- वसूल करण्यात आला. ३) जयवंत पी बांदल, एसएस टाईप, रूम नंबर २०२, सेक्टर १७, कोपरखैरणे, नवी मुंबई यांच्या बांधकामावर निष्कासनाची कारवाई करण्यात असून, दंडात्मक शुल्क रु.१०,०००/- दंड वसूल करण्यात आला.

# राज्यातील ‘ट्रिपल सीट’ सरकार औरंगजेबाच्या विचाराचे...

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०६, अहिल्यानगर :** राज्यातील ‘ट्रिपल सीट’ सरकार हे जुलमी सरकार असून ते औरंगजेबाच्या विचाराने चालत आहे. आता आपल्याला छत्रपती शिवाजी महाराजांच्या मावळ्यांसारखे लढायचे आहे, या माध्यमातून पुन्हा काँग्रेसचे गत वैभव निर्माण करून दिल्याशिवाय गप्प बसणार नाही, असे प्रतिपादन काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केले.



हर्षवर्धन सपकाळ यांची प्रदेशाध्यक्ष पदी नियुक्ती झाल्यानंतर ते प्रथमच आज, शुक्रवारी अहिल्यानगरच्या दौऱ्यावर आले होते त्यावेळी त्यांनी पक्षाच्या पदाधिकाऱ्यांची कार्यकर्त्यांशी संवाद साधला. सपकाळ उद्या, शनिवारपासून मस्साजोग ते बीड अशी सद्भावना यात्रा सुरू करत आहेत. मस्साजोग येथे जाण्यापूर्वी सपकाळ यांनी आज आदर्शगाव हिवरेबाजार येथे जाऊन पद्मश्री पोपटराव पवार यांची भेट घेतली. अहिल्यानगर शहरात काँग्रेस कार्यकर्त्यांशी संवाद साधल्यानंतर ते मढी (ता. पाथर्डी) येथे रवाना झाले. त्यांच्यासमवेत प्रदेश उपाध्यक्ष मोहन जोशी, प्रवक्ते अतुल लोंढे, जिल्हाध्यक्ष जयंत वाघ, माजी महापौर दीप चव्हाण आदी उपस्थित होते.

प्रदेशाध्यक्ष सपकाळ यांनी म्हणले, की, केंद्र व राज्य सरकार संविधान विरोधी वागत आहे. इंग्रजांसारखे तोडा-फोडा राजकारण त्यांनी स्वीकारलेले आहे. सामाजिक तेढ व पैशाचा वापर करून लोकशाही मूल्यांना धक्का लावत आहे. सामाजिक ध्रुवीकरण केले जात आहे. त्यांच्या कारभाराचा परिणाम होणार आका, कोयता, राख, वाळू अशा गँग तयार झाल्या आहेत. त्यातून राज्यात द्वेष, भय, गुंडागर्दी असे वातावरण निर्माण झाले आहे.या विरोधात समता, बंधुत्व अशी मूल्य प्रस्थापित करण्यासाठी आपली सद्भावना यात्रा आहे. हीच काँग्रेसची विचारधारा आहे. सत्ताधाऱ्यांना विचारधारेची काही देणेघेणे नाही. त्यामुळे सत्तेतील तिन्ही पक्षांची रोज भांडणे सुरू आहेत.

निवडणुकीत जय-पराजय सुरूच असतो. काँग्रेस मतांसाठी राजकारण करत नाही. समाजाला भयमुक्त करण्यासाठी, ज्वलंत प्रश्नासाठी लढणे ही काँग्रेसची विचारधारा आहे. तिचे पालन आम्ही करणार असेही सपकाळ म्हणाले.


**प्रमुखांची अनुपस्थिती...**

काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ प्रथमच जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले असतानाही माजी मंत्री, आजी-माजी आमदार, प्रमुख पदाधिकारी स्वागतास अनुपस्थित होते. अनेक पदाधिकारी सपकाळ निघून गेल्यानंतर बैठकस्थळी पोहोचले. आम्हाला आज सकाळी निरोप देण्यात आले, असे काहीजण सांगत होते. सपकाळ यांचा अहिल्यानगर शहरात नियोजित दौरा नव्हता, ऐनवेळी तो ठरला, असे समर्थन काही पदाधिकारी करत होते.

# आ.काशिनाथ दातेंनी विधानसभेत विविध प्रश्नांना फोडली वाचा...

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.७, अहिल्यानगर :** सध्या मुंबई येथे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू आहे. या अधिवेशनामध्ये गुरुवारी (दि.६) सकाळच्या सत्रात पारनेरचे आमदार काशिनाथ दाते यांनी मतदारसंघातील विविध प्रश्नांचा उहापोह करीत शासन दरबारी प्रश्नांची सरबत्ती केली. चौकट:: या प्रश्नाकडे देखील वेधले लक्ष पारनेर हे गाव तालुक्याचे ठिकाण आहे सर्व शासकीय विभागाचे कार्यालय असून यामध्ये पाटबंधारे विभाग, सार्वजनिक विभाग , कृषी विभाग या सर्व विभागांची कार्यालय भाडोत्री जागेवर असून भाड्याच्या जागेमध्ये आहेत. पारनेर या ठिकाणी प्रशासकीय इमारत झाली तर वेगवेगळ्या जागेमध्ये ज्या खोल्यांमध्ये घरांमध्ये काम करताय काम चालतंय ते एकाच ठिकाणी प्रशासकीय इमारती मधून जर चालले तर कामाच्या दृष्टीने येणारा तहसील मधून येणारा माणूस न्यायालयातून येणारा मनुष्य हा एकाच ठिकाणी त्याची सगळी कामे मार्गी लागली जातील यामुळे प्रशासकीय इमारत लवकरात लवकर मंजूर करण्यात यावी अशी मागणी आमदार काशिनाथ दाते सर यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनातील पुरवणी



मागण्यांवर बोलताना केली.

पारनेर तालुक्यातील देवीभोयरे फाटा ते पारनेर, सारोळा स्टेशन हा रस्ता आहे त्यावर एशियाई विकास बँक मार्फत साडेतीनशे कोटी रुपये खर्च करून तो रस्ता काँक्रिटीकरण होणार असून त्या रस्त्यावर अस्तगाव आणि सारोळा स्टेशन या गावच्या मध्ये रेल्वे क्रॉसिंग आहे. त्या ठिकाणी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकार्यांशी उपाय उपयोजना केलेली नाही . एवढ्या मोठ्या प्रमाणात खर्च करून या रस्त्याचे काम मार्गी लागत असताना अस्तगाव व सारोळा स्टेशन या दोन गावांना पुलाचा प्रश्न सुटलेला नसून येथे पूर्वीचा ब्रिटिश कालीन कमानीचा दगडी फुल ओढ्यामध्ये आहे. रस्त्याची वाहतूक ओढ्यावरून होत असून रेल्वे सुरक्षा बांधकाम अंतर्गत या ठिकाणी रेल्वे क्रॉसिंग पूल होणे अत्यंत गरजेचे आहे अशी मागणी केली.

पारनेर येथे न्यायालयाच्या इमारतीचे बांधकाम चालू आहे. परंतु इमारतीचे बांधकाम चालू असताना पारनेर गावापासून सहाशे ते सातशे किलोमीटर अंतरावर या इमारतीचे बांधकाम चालू आहे. तसेच एस टी बस स्टॅन्ड पासूनही हे बरेचसे अंतर असल्यामुळे या इमारत परिसरात वस्ती वाढलेली नाही त्या ठिकाणी न्यायालयामध्ये जे वकिलान मार्फत काम काज चालते जे वकील कामकाज करतात त्यांच्या दृष्टीने तिथे सुविधा नाहीत या न्यायालय इमारतीसाठी मोठा भूखंड असून पाच एकर जागा उपलब्ध आहे .या ठिकाणी सर्व वकिलांसाठी एक चेंबर मिळावे यासाठी इमारत होणे गरजेचे आहे किंवा बार असोसिएशन यांना शासनाने जागा उपलब्ध करून द्यावी अशी मागणी आमदार दाते सर यांनी शासनाकडे केलेली आहे.

राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानाच्या अंमलबजावणीसाठी आदर्श गाव राळेगणसिद्धी येथे सात कोटी रुपये खर्च करून प्राथमिक आरोग्य केंद्र उभारण्यात आले परंतु प्रार्थमिक आरोग्य केंद्राची इमारत उभी राहिली. या आरोग्य केंद्रामध्ये फर्निचर तसेच आरोग्याच्या दृष्टीने ज्या काही सुविधा उपलब्ध पाहिजे त्या कुठल्याही प्रकारे नाहीत तसेच या केंद्रामध्ये डॉक्टर , नर्स व इतर कोणताही स्टाफ नसल्यामुळे एवढ्या मोठ्या प्रमाणात खर्च करून इमारत उभी करण्यात आली मात्र ही इमारत धुळखात पडली आहे यामुळे तात्काळ निधी उपलब्ध करून हा दवाखाना पूर्वत व्हावा.

पारनेर व टाकळी ढोकेश्वर या ठिकाणी ग्रामीण रुग्णालय आहे. पारनेर या ठिकाणी शंभर खाटांचे रुग्णालय असून आणखी शंभर खाटांचे विस्तारित रुग्णालय करावे. टाकळी ढोकेश्वर या रुग्णालयाची इमारत २५ वर्षांपूर्वी काम झाले असून ही इमारत अत्यंत जुनी झाली असून आजतागायत पर्यंत एकदाही या इमारतीची डागडुजी केलेली नाही यामुळे याच ठिकाणी शेजारीच प्रार्थमिक आरोग्य केंद्राची रिकामी जागा आहे. या दोन्ही जागेवर जागेवर प्रशस्त ग्रामीण रुग्णालयाचे विस्तारीकरण करावे. या आदिवासी भागातील नागरिकांना या रुग्णालयाचा फायदा होईल असे आमदार दाते म्हणाले.

# कायम करा अथवा इच्छामरणची परवानगी द्या!

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०७, बुलडाणा :** राज्याच्या शैक्षणिक प्रगतीत महत्वाचा वाटा असतानाही राज्य शासन आणि प्रशासन यांच्या दुर्लक्षाचे बळी ठरलेल्या समग्र शिक्षा अभियान मधील कंत्राटी कर्मचाऱ्यांनी राज्यव्यापी काम बंद आंदोलन सुरु केले आहे.विधिमंडळ अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर मुंबई स्थित आझाद मैदान येथे राज्यातील समग्र कर्मचाऱ्यांनी ठिय्या दिला आहे. या आंदोलनात बुलढाणा जिल्ह्यातील ११० कंत्राटी कर्मचारी सहभागी झाले आहे. समग्र शिक्षा अभियानातील सन २००२ पासून कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्या प्रलंबित असून त्या मागण्यांच्या पूर्ततेसाठी समग्र शिक्षण विभागातील कर्मचाऱ्यांनी ४ मार्चपासून बेमुदत काम बंद आंदोलन पुकारले आहे.



मुंबई येथे सुरू असलेल्या या कामबंद आंदोलनात बुलढाणा जिल्ह्यातील ११० कर्मचारी सहभागी झाले आहेत. बुलढाणा जिल्ह्यात एकूण २१० कर्मचारी काम करीत असून त्यापैकी अपंग समावेशित शिक्षण विभागातील काही कर्मचारी शासनाने सन २०२४ मध्ये निवडणुकीच्या आधी कायम केले. मात्र याच विभागातील एमए बीएड, एमएससी, नेट, सेट, पीएचडी धारक, असे कर्मचारी काम करतात.तसेच यामध्ये जिल्हा समन्वयक, कनिष्ठ अभियंता, लेखनिक, लिपिक, विषयतज्ञ, डाटा एन्ट्री ऑपरेटर, एमआयएस को ऑर्डिनेटर इत्यादी कर्मचारी काम करतात. या कायम न केलेल्या कर्मचाऱ्यांनी ४ मार्चपासून मुंबई येथे काम बंद आंदोलन सुरू केले आहे.

आपल्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी या कर्मचाऱ्यांनी वेळोवेळी अधिवेशनावर मोर्चा, आंदोलने, उपोषण करून २० वर्षांपासून पाठपुरावा करीत आहे.आजपर्यंत शासनाकडून फक्त आश्वासन देण्यात आले. आतापर्यंत शासनाने बराच रोजंदारी व कंत्राटी कर्मचाऱ्यांना सेवेत कायम केले आहे. ५० टक्के कर्मचाऱ्यांना कायम केले असून ५० टक्के कर्मचारी तुटपुंज्या मानधनावर काम करीत आहेत.यातील बऱ्याच कर्मचाऱ्यांची वयोमर्यादा संपली असून शासनाने कायम करण्यासाठी नावापुरती समिती गठित केली आहे. परंतु, अजूनही एकही बैठक घेण्यात आले नाही. शासनाने राज्यातील उर्वरित ५० टक्के कर्मचाऱ्यांना कायम करावे, यासाठी काम बंद आंदोलन सुरू आहे. शासनाने या कर्मचाऱ्यांना कायम करावे किंवा इच्छा मरणाची परवानगी द्यावी, अशी मागणी आंदोलनात सहभागी कर्मचाऱ्यांनी केली आहे.

दरम्यान आज बुलढाणा शिक्षणाधिकारी यांना निवेदन देण्यात आले. बुलढाणा जिल्हाध्यक्ष रामेश्वर काळवाघे, सपकाळ आशिष वाघ, ईश्वर वाघ, प्रकाश कुलकर्णी यांनी निवेदन देऊन कर्मचाऱ्याच्या अडचणीकडे लक्ष वेधले.

# ७२वी राज्य अजिंक्यपद कबड्डी स्पर्धा ठाण्यात रंगणार

**अक्षराज : संदिप येवले**

**दि.०७, मुंबई :** महाराष्ट्र राज्य कबड्डी असो.च्या मान्यतेने ठाणे जिल्हा कबड्डी असो. विश्वास सामाजिक संस्था,ठाणे यांच्या सहकार्याने ७२व्या पुरुष व महिला गट राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेचे आयोजन करीत आहे. ठाण्यातील कॅडबरी कंपनी समोरील जे. के. केमिकल कंपनीच्या क्रीडांगणावर दिनांक १९ ते २३ मार्च २०२५ या कालावधीत ही स्पर्धा रंगेल. राज्य अजिंक्यपद स्पर्धेच्या निमित्ताने पहिल्यांदाच ठाण्याने बिबट्या या बोधचिन्हाचा वापर करण्यात आला आहे. अहमदनगर येथे झालेल्या ७०व्या राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेत बारशिंगे याचा बोधचिन्ह म्हणून वापर करण्यात आला होता.




सर्व सामने मातीच्या ६ क्रीडांगणावर खेळविण्यात येणार असल्यामुळे त्याची तयारी सुरू करण्यात आली आहे. सर्व सामने सायंकाळच्या सत्रात प्रखर विद्युत झोतात खेळविण्यात येणार आहेत. कबड्डी रसिकांना खेळाचा आनंद मनमुराद घेता यावा म्हणून दहा हजार क्षमतेची प्रेक्षक गॅलरी उभारली जाणार आहे. सर्व संलग्न जिल्हा संघानी आपले संघ दिनांक १८ मार्च रोजी दुपारी १२-०० वाजल्यानंतर स्पर्धेच्या ठिकाणी उपस्थित करावे. त्याच दिवशी खेळाडूंची वजने घेतली जातील. रेल्वेने येणाऱ्या संघाकरिता ठाणे रेल्वे फलाट क्रमांक १ वर स्वागत कक्ष उभारण्यात येणार आहे. जिल्हा संघानी आपल्या आगमनाची पूर्व सूचना दिल्यास त्यांना स्पर्धेच्या ठिकाणी पोहचविण्याची व्यवस्था करता येईल. अशी माहिती एका पत्रकाद्वारे स्पर्धा आयोजन समितीचे प्रमुख संजय वाघुले अध्यक्ष- विश्वास सामाजिक संस्था, ठाणे जिल्हा कबड्डी असो.चे अध्यक्ष कृष्णा पाटील व सचिव मालोजी भोसले यांनी सर्व प्रसार माध्यमाना दिली.

# अक्षराज

२ बुलडाणा, शनिवार, दि.०८ मार्च २०२५ विविधा


## संपादकीय

### संकल्प महिलांना आर्थिक सक्षम करण्याचा...




८ मार्च हा दिवस जागतिक महिला दिन म्हणून जगभर साजरा केला जातो. आपल्या देशातही हा दिवस मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. आजच्या दिवशी वेगवेगळ्या क्षेत्रात स्वतःचा ठसा उमटवणाऱ्या महिलांचा गौरव केला जातो. सर्वच क्षेत्रात महिला आज पुरुषांच्या बरोबरीने काम करीत आहेत. असे कोणतेही क्षेत्र नाही की ज्यात महिला पुरुषांच्या मागे आहेत. राजकारण, समाजकारण, कला, क्रीडा, साहित्य,विज्ञान, तंत्रज्ञान, शिक्षण, उद्योग अशा सर्वच क्षेत्रात महिला आपल्या कर्तृत्वाचा झेंडा रोवताना दिसत आहे. पूर्वी चूल आणि मूल ही जी महिलांची ओळख होती ती आता पुसली गेली आहे. मागील शतकात किंवा अगदी काही दशकांपूर्वी म्हटले तरी चालेल महिला सक्षम नव्हत्या. पुरुषप्रधान संस्कृतीमुळे महिला कायम दुर्लक्षित होत्या. सावित्रीबाई फुले यांच्यामुळे महिलांनी पहिल्यांदा घराचा उंबरठा ओलांडला. शिक्षणामुळे महिला स्वतःच्या पायावर उभ्या राहू लागल्या. शिक्षणामुळेच महिला सक्षम झाल्या असे असले तरी आजही देशातील महिला आर्थिकदृष्ट्या सक्षम आहेत का ? असा प्रश्न खेदाने विचारावा वाटतो. आज सर्वच क्षेत्रात महिला पुढे असल्या तरी त्या आर्थिकदृष्ट्या सक्षम नाहीत असे म्हणावे लागेल. आज खाजगी तसेच शासकीय नोकऱ्यांमध्ये महिलांचे प्रमाण खूप आहे. अनेक महिला उच्चपदावर कार्यरत आहेत. असे असले तरी नोकरी करणाऱ्या महिलांचा त्यांच्या पगारावर कितपत अधिकार आहे हा संशोधनाचा विषय आहे. नोकरी करणाऱ्या महिलांना स्वतःचा पैसा स्वतः खर्च करण्याचा अधिकार नाही. आपल्या देशातील सर्वाधिक महिला या घरकामात गुंतलेल्या असतात. त्यांना आर्थिकदृष्ट्या पतीवर अवलंबून राहावे लागते. या महिला आर्थिकदृष्ट्या सक्षम नाहीत. समाजात माणूस म्हणून जगायचे असेल तर आर्थिकदृष्ट्या सक्षम होणे आवश्यक आहे. मध्ययुगात स्त्री ही एक असहाय्य व्यक्तिमत्त्व की जिला स्वतःचे अस्तित्वच नाही, अशी प्रतिमा समोर आली त्याला छेद देण्याचा प्रयत्न अजूनही चालू आहे. पुरुषप्रधान संस्कृती आल्यापासून पुषांच्या लेखी महिलांचा दर्जा दुय्यम होत गेला. वेतनासंबंधी भेदभाव, स्वयंरोजगार, अर्थसाहाय्याचा अभाव, विनावेतन काम व बेरोजगारी, कुटीर उद्योगात मालकी हक्क नसणे अशा अनेक कारणांमुळे महिलांचे आर्थिक स्थान पुरुषांपेक्षा दुय्यम राहिले आहे. आज २१ व्या शतकातही तो दुय्यमच आहे. हा दुय्यम दर्जा जाऊन महिलांना पुरुषांच्या बरोबरीने मनाचे स्थान मिळवून द्यायचे असेल तर त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हावेच लागेल. महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करायचे असेल तर महिलांना स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून द्यायला हव्यात. महिला मंडळे, स्वयंसहाय्यता बचत गट, विविध संस्था यांच्या माध्यमातून महिलांनी एकत्र येऊन आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हावे, यासाठी समाजानेही व्यासपीठ उपलब्ध करुन द्यायला हवे. पुरुषांनीही आपली पुरुषी मानसिकता सोडून महिला सक्षमीकरणासाठी प्रयत्न करायला हवेत. महिलांच्या पगारावर महिलांचाच अधिकार असायला हवा. महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करुनच आपण देश सक्षम करु शकतो. देशाचा विकास करायचा असेल तर महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करायलाच हवे.

# संत स्त्रियांच्या वांङ:मयातून अस्मिता व कर्तृत्वाची जाणीव

महाराष्ट्र ही संतांची भूमी म्हणून ओळखले जाते. संत मंडळीच्या कार्याची नोंद घेतांना संतांच्या चळवळीला भक्ति आंदोलन संबोधले गेले. या चळवळीमध्ये स्त्री संतांचाही समावेश आहे. या माध्यमातून त्यांनी स्त्रियांच्या मनामध्ये अस्मिता व कर्तृत्वाची जाणीव करून दिली. न्यूनगंडाने पछाडलेल्या तळागाळातल्या जनमानसांमध्ये व स्त्रियांमध्ये आत्मविश्वास निर्माण केला.

तत्कालीन सामाजिक परिस्थिती वेगळी होती वाट्याला आलेल्या दुखी जीवनाबद्दल तक्रार न करता रूढी व परंपरेच्या चाकोरीतून बाहेर पडल्या. गुरूंना उच्च स्थानी मानून वाययाची निर्मिती केली व त्याचबरोबर आत्मिक व आध्यात्मिक जाणीव याचा आविष्कार निर्माण करून आजच्या पिढीला प्रेरणादायी ठरल्या. संत मुक्ताबाई ह्या स्त्री संतांमधील आद्य कवयित्री म्हणून ओळखल्या जातात. संत मुक्ताबाई यांच्या ५० अभंगातून मुक्ताई चांगदेव संवाद, अंगाई गीत व ताटीचे अभंग दिसून येतात. लौकिक जीवनात विसंगत वाटणारा अनुभव गुढ स्वरूपात प्रकट होतांना पुढील रचनेतून दिसून येते.मुंगी उडाली आकाशी । तिने गिळले सूर्याशी । थोर नवलाव झाला । वांझे पुत्र प्रसवला ।। एका समंजस मनाची अभिव्यक्ती म्हणून ताटीचे अभंग आपण बघतो. समाज व संत नात्यातील उकल आपणास दिसून येते. विश्वरागे झाले वन्ही । संती सुखी व्हावे पाणी । संत तोचि जाणे जगी । दया क्षमा ज्याचे अंगी ।तुम्ही तरुण विश्वतारा ।ताटी उघडा ज्ञानेश्वरा ।। अशाप्रकारे संत मुक्ताई यांच्या अभंगातून आत्मोद्धार व जगाचे कल्याण सामावलेले दिसून येते. संत गोणाई वारकरी संतांपैकी संत नामदेव यांची आई म्हणून ओळख आहे. संत नामदेवाच्या गाथामध्ये त्यांचे विठ्ठलाशी संवाद पर अभंग आहेत. त्यामध्ये आपल्या मुलाविषयी अर्थात संत नामदेवाविषयी वाटणारी प्रेमाची वात्सल्याची जाणीव दिसून येते.त्याचबरोबर संत नामदेवाची पत्नी राजाई त्यांचे काही अभंग आहेत. त्यांचे विठ्ठलाची भांडण अगतिकता दुःख घरातील वाताहत पत्नी म्हणून वाटणारी पतीविषयी आपुलकी त्यांच्या अभंगातून दिसून येते व तशी तक्रार राजाई आपल्या अभंगातून रुखमाई मातेजवळ जवळ करताना दिसून येते. दोन प्रहर रात्र पाहुनी एकांत । राजाई वृत्तांत सांगे माते। अहो रुखमाबाई विठोबाची पांगा । भ्राताशी का वेडे केले ।। त्याचप्रमाणे आऊबाई संत नामदेवाची बहीण यांचे दोन अभंग



आहेत तर लाडाई संत नामदेवांची थोरली सून तर कन्या लिंबाई यांच्या सुद्धा एक अभंग आहे. त्याचप्रमाणे संत सखुबाई, परिसा भागवत यांची पत्नी कमळजा यांचीही विठ्ठल भक्ती व आध्यात्मिक शक्ती दिसून येते. परंतु त्यांच्या नावे अभंगाची नोंद मात्र दिसून येत नाही.

संत जनाबाई या नामयाची दासीम्हणून संत नामदेवाच्या प्रभावळीतील ही कवयित्री वारकरी संत म्हणून मराठवाड्यातील गंगाखेड येथील असून त्यांच्या नावे जवळपास ३५० अभंगांची नोंद आपणास दिसून येते. माय मेली, बाप मेला । आता सांभाळी विठ्ठला असा आर्त टाहो फोडणाऱ्या जनाबाईला मात्र नामदेवांच्या कुटुंबाने सांभाळले. यांची विठ्ठलाप्रती भक्ती एवढी आहे की, विठ्ठलाशी भांडण सुद्धा अभंगाच्या माध्यमातून करताना दिसून येतात. संत सोयराबाई या संत चोखोबा यांची पत्नी यांच्या नावे ६२ अभंग आपणास दिसून येतात.या अभंग निर्मितीच्या पाठीमागे संत चोखोबाची प्रेरणा दिसून येते. सामाजिक विषमता, उपेक्षा ही नियतीमुळे होणारा छळ यांची परखड मंडणी त्यांनी केली.विठ्ठलाशी संवाद करताना सोयराबाई अभंगातून म्हणतात, आमची तो दशा विपरीत झाली । कोण आम्हा घाली पोटामध्ये । आमचे पालन करील बा कोण । तुजविण जाण दुजे आता ।। विठ्ठलावरची नाराजी त्यांनी त्यांच्या अभंगातून व्यक्त केली आहे. काबा उदास मन केले । कोण म्हणे तुम्हा भले । आम्ही बैसलोची दारी । दे दे म्हणून मी मागतो हरी । होऊन या बसलासी बहुतांचे । गोड कैसे तुम्हा वाटे । ही नित नव्हे बरी । म्हणे चोखयाची महारी ।। याचप्रमाणे संत सोयराबाईंनी विटाळा संदर्भातील काही अभंग लिहिले असून, क्रांतिकारक विचारांची पेरणी केलेले दिसून येते. संत चोखोबाची धाकटी बहीण संत निर्मळा यांचे सुद्धा काही अभंग आपणास दिसून येतात. त्यांच्या अभंगातून मनाची कातरता, परमेश्वर भेटीची तळमळ,मनाची होणारी कोंडी व विठ्ठलाविषयीचा जिव्हाळा दिसून येतो. संत भागुबाई ह्या संत चोखोबाच्या परिवाराशी सलग्नित दिसून येतात. त्यांचे सुद्धा अभंग सकल संत गाथे असल्याची नोंद आहे. आलो तुझ्या दर्शनाशी । भेट द्यावी आम्हासी । सर्व संत हो राऊळी । मी रे एकटी तळमळी ।। हेटाळणीचा, तिरस्काराचा अनुभव अभंगाच्या माध्यमातून प्रकट केलेला दिसूनयेतो. त्याचप्रमाणे मागेपुढे नाही कोणी । सख्या विठ्ठला वाचोनी । येथे संत भागुबाईची विठ्ठलासक्ती अतिशय प्रभावी आहे.विठ्ठला विषयीचे अपार प्रेम दिसून येते. महानुभाव पंथातील ज्येष्ठ संन्याशी जालना जिल्ह्यातील रामसगाव येथील महादाइसा या सुद्धा कवियत्री म्हणून ओळखल्या जातात.

बालवयातील विधवापण त्यामुळे परत वडिलांकडे वास्तव्य व त्यातून त्यांना भक्ती मार्गाची व परमार्थाची ओढ लागली. प्रथम त्या दादासोच्या शिष्या झाल्या व तत्कालीन श्री चक्रधर स्वामी यांनी महानुभव पंथांची स्थापना केली व या पंथात स्वामी चक्रधरांनी यांनी सर्व स्त्री - पुरुष संन्यासांना सामावून घेतले. मुळातच महादाईसा यांना कृष्ण भक्तीची आवड होती.या माध्यमातून त्यांनी काही वाङ:मय लिखाण केले. त्यापैकी मातृकी सेवा स्वयंवर, गर्भकांड ओव्या प्रसिद्ध आहेत. त्या पंथातील ज्येष्ठ असल्याकारणाने त्यांना आई म्हणून संबोधत. त्याचप्रमाणे संत कान्होपात्रा या मंगळवेढ्याच्या शामा नाईकेची मुलगी, त्यांच्या नावे सकल संत गाथेत एकूण २३ अभंगांचा उल्लेख दिसून येतो.आईच्या व्यवसायाच्या दृष्टिकोनातून संत कान्होपात्रा यांचा जीवनप्रवास पूर्णपणे विरोधाभासीत दिसून येतो. त्यांच्या अभंगामध्ये करुणा भावाचे वैशिष्ट्यपूर्ण दर्शन घडते. नको देवराया अंत आता पाहू । प्राण हा सर्वथा जाऊ पाहे । हरणीचे पाडस व्याघ्र धरियेले । मजलागी जाहले तैसे देवा ।। विठ्ठलाला सर्वस्व समर्पण करण्याचा भाव त्यांच्या रचनेतून दिसून येतो, तर दुसऱ्या बाजूला मनाची घालमेल,चारित्र्यशीलतेची जपणूक दिसून येते. म्हणून अखेरीस विठ्ठलाच्या चरणी देह समर्पण करणाऱ्या कान्होपात्रेचे समर्पण मनाला चटका लावून जाते. वारकरी संप्रदायाचे कळस झालेले संत तुकोबाराय यांना गुरु मानून संत बहिणाबाईंनी तत्कालीन काळात तुकोबाच्या प्रेरणेने जवळपास ७४ अभंगाची रचना आत्मकथन समकक्ष आहे, कारण त्यांच्या जीवनातील संघर्षमय कथा अतिशय विदारक आहे. एवढे असूनही आनंद आणि वेदना अशी समिश्र अवस्था त्यांच्या अभंग रचनेतून दिसून येते. एकनिष्ठ भाव तुकोबा चरणी । म्हणुनी बहिणी लाभानिसे । बहिणी म्हणे तुका सद्गुरु सहोदर । भेटला अपार सुख होऊ पाहे ।।

अशाप्रकारे वारकरी संप्रदाय व इतर पंथातील संत स्त्रियांची भक्ती-आंदोलनाची चळवळ दिसून येते.तत्कालीन परिस्थिती लक्षात घेता स्त्रियांना पुरेशे स्वातंत्र्य व अधिकार नसतांनाही ईश्वर भक्ती,दर्शनाची ओढ, परमेश्वराशी सुख-दुःखाचा संवाद साधत,स्त्रीयांमध्ये अस्मिता व कर्तृत्वाची जाणीव करून देण्याचे कार्य त्यांनी केले. ते आजच्या स्त्रियांसाठी जेवढे प्रेरणादायी आहे तेवढेच येणाऱ्या पिढीसाठीसुध्दा प्रेरणादायी असेल.

**श्री.विनोद शेनफड जाधव**
**मासरूळ जि.बुलडाणा**
**मो.नं.९७६३२८२०७७**

## बाईचा जन्म..

अल्लादिनचा चिराग
हळू पाहीला घासून
ब-याचं वेळे नंतर रे
जीन निघाला त्रासून

मी अक्काचा गुलाम
महिलादिवस म्हणून
काम करणार त्यांचे
रे घेई आका जाणून

ताईंची सगळी कामे
करतो सकाळपासून
एक काम संपले कि
दुसरे उभे आ वासून

राक्षसी कामे थकेना
जीनच गेलायं थकून
महिला व्यग्र कामात
देती स्वतांस झोकून

बाईचा जन्म कठीण
आज आले उमजून
कधीतरी माऊलीला
कुणी घेतले समजून

अखंडकार्यमग्न तरी
ना गेली ती कोमेजून
स्वागता सिध्द हसत
कशी ये सजून धजून

जीनपरतला दिव्यात
विचार नवा उजळून
दिव्यदिवा नारी तूचि
पुरुषी अहं गं जाळूने

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

## व्यथा स्त्रीच्या अंतरीच्या

व्यथा स्त्रीच्या अंतरीच्या तिने
सांगाव्यात कोणाला?
हृदयातील वेदना तिने
ऐकवाव्यात कोणाला?

स्त्रीच्या मनात काहूर विचारांचे
फक्त कुटुंबासाठी जगणे तिचे
दिवस रात्र स्त्री कष्टते राबते
स्वतःला मात्र ती हरवून बसते

बालपणी आईवडील ओरडतात
तरुणपण भाऊरायांच्या धाकात
लग्नानंतर नवरा तिचा मालक
वृध्दपणी तिची मुले तिचे पालक

स्वतःचे अस्तित्व नसते स्त्रीला
स्वतंत्र विचार नसतात तिला
दुसऱ्यांच्या आदेशांची पाईक ती
मन मारून जगणारी गुलाम ती

व्यवस्थेच्या ओझ्याने दबली स्त्री
परंपरेच्या माऱ्याने थकली ती
नरनारी समान फक्त पुस्तकांमध्ये
मानसन्मान मिळेना समाजामध्ये

जागतिक महिला दिनानिमित्त
पुरुषा जप स्त्रीचा मानसन्मान
जगू दे थोडं तिला मनमोकळे
ती साऱ्या जगाची आन बान शान

**- बबन दामोदर गुळवे**
**उमरगा कोर्ट ता.अहमदपूर**
**जि.लातूर मो.९५४५४४२६४८.**

## महिला सक्षमीकरण अत्यावश्यक !

प्रतिवर्षी जागतिक महिला दिन देशभर उत्साहात साजरा केला जातो. या दिवशी नेतेमंडळींकडून स्त्री पुरुष समानतेच्या, महिलांच्या सक्षमीकरणाच्या गोष्टी केल्या जातात, महिलांचा आदर करण्याचे सल्ले दिले जातात. महिलांच्या सन्मानार्थ शासकीय कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. वृत्तपत्रे आणि वृत्तवाहिन्यांतून कर्तृत्ववान महिलांचा गौरव केला जातो, या दिवशी अनेक दुकानांमध्ये, ऑनलाईन शॉपिंग साईट्सवर महिलांसाठी विशेष सवलत दिली जाते. या एक दिवशी महिलांना यथोचित सन्मान दिला जात असला तरी अन्य दिवसांतील महिलांविषयक गुन्ह्यांचा आलेख पाहता तो आजवर नेहमीच चढता राहिला आहे, दिवसागणिक समाजाचे होत चाललेले नैतिक अध:पतन ही चिंतेची बाब आहे. त्यावर आज उपाययोजना काढली नाही, तर भविष्यात स्त्रियांना समाजात वावरणेही कठीण होऊ शकते. त्यासाठी सर्वप्रथम अश्लील संकेतस्थळाच्या प्रसारणावर पूर्णतः बंदी आणणे आवश्यक आहे. वेब सिरीज, चित्रपट आणि जाहिरातींमध्ये अश्लील आणि कामुक दृश्ये दाखवण्यास प्रतिबंध घातला पाहिजे. बलात्कार आणि विनयभंगाच्या गुन्ह्यातील आरोपींना अश्लील मालिकांतून आणि दृश्यपटांतून प्रेरणा मिळत असल्याचे निरीक्षण संबंधित गुन्हेगारांच्या सर्वेक्षणातून एका संस्थेने समोर आणले आहे. त्यामुळे या बाबीकडे सरकारने गांभीर्याने पाहायला हवे. शाळा महाविद्यालयांतून नैतिक मूल्याचे शिक्षण अनिवार्य केले जावे आणि या विषयाच्या वर्गामध्ये थोरा मोठ्यांच्या चरित्रांसोबत रणरागिणी झाशीची राणी, राजमाता जिजाऊ, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांसारख्या शूर आणि कर्तृत्ववान योध्यांची चरित्रे शिकवली गेली पाहिजेत. मुलींना शाळा महाविद्यालयांतून स्व-संरक्षणार्थ ज्युडो कराटेचे, लाठीकाठीचे प्रशिक्षण अनिवार्य केले पाहिजे. इतरांवर अवलंबून राहण्याऐवजी स्वतःच्या रक्षणाची जबाबदारी प्रत्येक स्त्रीने स्वतःच घेतली पाहिजे. व्यवहारिक जीवनातील नानाविध क्षेत्रे आज स्त्रीने पादाक्रांत केली आहेत, मात्र या प्रगतीला सक्षमीकरण म्हणता येणार नाही. ज्या दिवशी स्त्री स्वतःचे रक्षण करण्यास सिद्ध होईल, ज्या दिवशी स्त्री अत्याचाराचा आलेख घसरू लागेल तेच खऱ्या अर्थाने महिला सक्षमीकरण असेल.

**- सौ. मोक्षदा घाणेकर, काळाचौकी**

## पैशाचा पाऊस पाडणाऱ्यांचा नाडे ग्रामस्थांनी उधळला डाव

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०६, पेण :** पेण तालुक्यातील वाकरूळ ग्रामपंचायत हद्दीत असणाऱ्या नाडे गावाच्या स्मशानभूमीत बुधवार ५ मार्च रोजी रात्री १ वाजण्याच्या सुमारास अनोळखी ५ ते ६ व्यक्तींनी अघोरी प्रथेचा डाव मांडला होता. ही खबर नाडे ग्रामस्थांना कळताच गावातील ग्रामस्थांनी स्मशान भूमीवर येऊन पाहिले तर कोणी एका अनोळखी जिवंत व्यक्तीला कपड्यात बांधून स्मशान भूमी सभोवताली फिरवला जात आहे असे समजताच ग्रामस्थांनी त्यांना पुढे जाऊन विचारणा करताच या अनोळखी व्यक्तींची पळापळ झाली. ग्रामस्थांनी मोठ्या शिताफीने यातील २ व्यक्तींना पकडले आणि पोलिसांना बोलावून पोलिसांच्या ताब्यात दिले.

यावेळी स्मशान भूमीवर या अघोरी करणाऱ्या टीम ने नारळ लिंबू एका मनुष्य देहाची कवटी, हळद कुंकू होमाच्या समिधा, डमरू, शंख आणि इतर साहित्य मिळाला असून नाडे गावातील ग्रामस्थांच्या सतर्कतेमुळे एक मोठा अनर्थ टळला आहे.


This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## महाराष्ट्राचा आर्थिक पाहणी अहवाल २०२४-२५ जाहीर - आर्थिक संकट गडद

**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.०७, डोंबिवली (ठाणे) :** महाराष्ट्र सरकारने आर्थिक पाहणी अहवाल २०२४-२५ सादर केला असून, राज्याच्या आर्थिक स्थितीविषयी महत्त्वाची माहिती समोर आली आहे. राज्याचे एकूण स्थूल उत्पन्न ४५ लाख ३१ हजार ५१८ कोटी रुपये असले तरी आर्थिक संकट अधिक गडद होत चालल्याचे दिसत आहे. आर्थिक विकास दर ७.३ टक्के असल्याचा अंदाज आहे. मात्र महसुलात ३% घट झाल्याने आणि उत्पन्नापेक्षा खर्च जास्त असल्याने राज्यावर आर्थिक दबाव वाढला आहे.

**राज्याच्या आर्थिक स्थितीवर परिणाम करणारे मुद्दे -**

दरडोई उत्पन्नात मोठी घसरण: कधी काळी देशात अव्वल असलेल्या महाराष्ट्राची घसरण होत असून, राज्याचा क्रमांक आता ६ व्या स्थानी गेला आहे.

तेलंगणा, कर्नाटक, हरियाणा, तामिळनाडू आणि गुजरात ही राज्ये महाराष्ट्राच्या पुढे गेली आहेत.

११ जिल्ह्यांचे दरडोई उत्पन्न राष्ट्रीय सरासरीपेक्षा कमी, त्यामुळे आर्थिक समतोल बिघडल्याचे स्पष्ट होते.

भांडवली खर्चासाठी राज्याला नवे कर्ज घ्यावे लागणार, त्यामुळे महाराष्ट्राच्या अर्थसंकटाचा आणखी वाढ होण्याची शक्यता आहे.

**आर्थिक नियोजनाची गरज -**

राज्याच्या आर्थिक घसरणीचे मूळ कारण महसुलातील घट आणि वाढती कर्जे असल्याचे अर्थतज्ज्ञांचे मत आहे. आर्थिक नियोजनात सुधारणा आणि नवीन उद्योग, गुंतवणूक याकडे लक्ष दिले गेले नाही, तर महाराष्ट्राची आर्थिक पीछेहाट अधिक गंभीर होऊ शकते. राज्य सरकारने या संकटावर तोडगा काढण्यासाठी धोरणात्मक पावले उचलण्याची गरज असल्याचे जाणकारांचे मत आहे.

## फ/उत्तर विभागाच्या सांघीक क्रीडा स्पर्धा संपन्न



**अक्षराज : प्रभाकर हजारे**

**दि.०७, मुंबई :** बृहन्मुंबई महानगरपालिका शारीरिक शिक्षण विभाग फ/उत्तर आयोजित सन २०२४-२५ च्या सांघिक क्रीडा स्पर्धा जी टी बी नगरच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर मैदानावर अतिशय उत्तम प्रकारे आणि खेळीमेळीच्या वातावरणात पार पडल्या.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, गेल्या दोन महिन्यांपासून महानगरपालिका शाळेचे विद्यार्थी व शारीरिक शिक्षण शिक्षक या स्पर्धांची तयारी करीत होते. अखेर प्रशासकीय मान्यता घेऊन या स्पर्धा संपन्न झाल्या. स्पर्धेचे उद्घाटन वरिष्ठ पर्यवेक्षक दत्तू लवटे यांच्या शुभहस्ते व कनिष्ठ पर्यवेक्षक मधुकर माळी, सुभाष डोफे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले.

यावेळी कबड्डी, खो-खो, लंगडी या खेळांच्या स्पर्धा घेण्यात आल्या. स्पर्धेसाठी एकूण ३१२ मुलामुलींच्या २६ संघांनी सहभाग घेतला होता. कबड्डी खेळताना मुले व मुली उत्साहात खेळत होते.खो खो मध्येही बऱ्याच खेळाडूंनी चपळतेने सूर मारून आपल्यातील कसब दाखवून दिले. क दा गायकवाड मनपा शाळा, जोगळेकर वाडी मनपा शाळा, सायन कोळीवाडा, प्रा.वामनराव महाडिक शाळा, प्रतिक्षा नगर मनपा शाळा अशा नामांकित शाळेचे संघ या स्पर्धेत उतरले होते. फ/उत्तर विभागातील सर्व शारीरिक शिक्षण शिक्षकांनी मेहनत घेऊन संघ तयार केले होते. स्पर्धेत विजयी झालेल्या प्रथम व द्वितीय विजेत्या संघांना फ/उत्तर विभागाचे प्रशासकीय अधिकारी किसन पावडे यांच्या शुभहस्ते आकर्षक ट्रॉफी, मेडल व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.या बक्षीस वितरण समारंभाला शारीरिक शिक्षण विभागाचे कनिष्ठ पर्यवेक्षक व स्पर्धा प्रमुख मधुकर माळी, कनिष्ठ पर्यवेक्षक अनिल सनेर, शाळेचे मुख्याध्यापक सतीश सातपुते, माजी कनिष्ठ पर्यवेक्षक धैर्यधर पाटील हे आवर्जुन उपस्थित होते.

दैनिक अक्षराज चे पत्रकार व शारीरिक शिक्षण शिक्षक प्रभाकर हजारे मुंबई, कबड्डी असोसिएशनचे पंच वासुदेव बजागे, शा शि. गणेश डहाळे,रश्मी राणे या इतर विभागाच्या शिक्षकांनी पंच म्हणून चोख काम पाहिले. या स्पर्धा यशस्वी होण्यासाठी शारीरिक शिक्षण शिक्षक प्रदीप पाटील, पुंडलिक पाटील, नंदू सुरकूटवार, अरविंद भांबळे, राजेश अवघडे, दत्ता लोणारे, आनंदा पाटील, विठ्ठल उघडे,विजय वाकुडे, नरेंद्र महाजन, मधुकर कांबळे, श्रद्धा जाधव, माधवी पोकळे, किशोर बोरसे, नितीन पाटील, दिलीप कोठावळे यांनी मेहनत घेतली.

## दिपक फाऊंडेशनच्या वतीने विविध शासकीय दाखल्यांचे शिबिर संपन्न



**अक्षराज : प्रमोद मौळे**

**दि.०७, जव्हार (पालघर) :** मोखाडा तालुक्यातील मौजे हट्टी पाडा व पंचक्रोशीतील नागरिकांसाठी दिपक फाउंडेशन, जे.एम.फायनशल, ग्रामपंचायत उधळे वाकडपाडा वतीने विविध शासकीय दाखल्यांचे शिबिर आयोजित केले होते. शुक्रवार, दिनांक ०७ मार्च २०२५ रोजी सकाळी मोखाडा पंचायत समितीचे माजी सभापती प्रदीप वाघ यांच्या उपस्थितीत शिबिराची सुरवात झाली. यावेळी प्रदीप वाघ यांनी संस्थेच्या कामाची प्रशंसा केली. नागरिकांनी या शिबिराचा लाभ घ्यावा. असे आवाहन देखील केले.

यावेळी सरपंच लता वारे, उपसरपंच नंदकुमार वाघ व ग्रामस्थ उपस्थित होते. या शिबिरात पॅन कार्ड, आधार कार्ड, श्रम कार्ड, आयुष्यमान भारत कार्ड, मतदान कार्ड, जातीचा दाखला, उत्पन्न दाखला, सातबारा उतारा, विविध शासकीय योजना कृषी, समाज कल्याण, प्रकल्प कार्यालय, पंचायत समिती जिल्हा परिषद, व विविध प्रकारचे दाखले काढण्यासाठी अर्ज भरुन घेतले.

या आधी देखील ८ ग्रामपंचायतमध्ये असे उपक्रम राबविण्यात आले आहे. जे.एम.फायनासिंयल फाउंडेशन व दिपक फाऊंडेशन आणि ग्रामपंचायत उधळे वाकडपाडा अस संयुक्त आयोजन केले होते. शिबिरात संस्थेच्या वतीने प्रोजेक्ट कॉर्डीनैटर मोनिका कापुरे, संदेश घोडकी, शाहरुख शेख,ललेश वळवी दत्तात्रय ठोमरे, रोहित शिंदे, दिनेश ठोमरे, विलास वाघ, विनोद कलींगडे, अरविंद वाघ, नितेश बुधर, पांडुरंग जोशी यांनी काम पाहिले. यावेळी अनेक लाभार्थ्यांनी दाखले काढण्यासाठी लाभ घेतला.

# शिळफाटा परिसरात अनाधिकृत बिल्डिंग वर कारवाई कधी?

## हायकोर्टाचे, मुख्यमंत्र्याचे आदेश असताना सुद्धा अधिकाऱ्यांची कारवाई का नाही



**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.०७, शिळफाटा (ठाणे) :** गुरुवार, दिनांक ०७ मार्च २०२५ रोजी सकाळी १० वाजता कल्याण फाटा येथे एका कार्यालयात पत्रकार परिषद घेण्यात आली. सर्वात अगोदर शिळफाटा परिसरामध्ये लख्खिकपाउंडमध्ये ११ वर्षांपूर्वी पत्त्यासारखी बिल्डिंग कोसळली होती त्याच्यामध्ये ७४ निष्पाप नागरिकांचा जिव गेला होता. त्या सर्वांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली. शिळफाटा परिसरातील लख्खिकंपाउंड हादसाला ११ वर्षे पूर्ण झाली. या हादसामध्ये ७४ निष्पाप नागरिकांचा जीव गेले. अजून त्यांना न्याय नाही मिळाला. त्याच जागेवर स्मारक उभ करणे गरजेचे असताना तिथे अनाधिकृत बांधकामे झाली आहेत.

२०१३ च्या हादस्या करीता मनिष जोशी अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली एकही अनाधिकृत बांधकाम होणार नाही म्हणून त्यांची नियुक्ती करण्यात आली होती.आज शिळफाटा विभागात २०० हुन अधिक अनाधिकृत बिल्डिंग मनीष जोशी च्या आशिर्वादाने उभ्या राहिल्या आहेत. याचे कारण म्हणजे प्रत्येक स्लॅप मागे ३ ते ५ लाख घेतले जातात हि सत्य परिस्थिति आहे. त्याचा हिस्सा कोन कोन खातो हे जग जाहीर आहे.वसुली साठी मनिष जोशी आणि महेश आहेर यांनी माणस ठेवली आहेत. मनिष जोशी आणि महेश आहेर सारखे अधिकारी अनाधिकृत चा स्कॉम चालवत आहेत. यामध्ये याना चालवणारा आका कोन हे देखिल जनतेला ठाऊक आहे. यामध्ये आयुक्त ते जिल्हाधिकारी यांचा खारुचा वाटा आहे. सरकारी जागांवर होणाऱ्या बांधकामाचे कारवाई न होण्यासाठी लोकप्रतिनिचे फोन येत असतात. फोन करण्यापुर्वी लोक प्रतिनिधींनी यांची शहानिशा केली पाहीजे. आपला कार्यकर्ता आपल्या नाव वापरून काय करतो याची माहिती लोकप्रतिनिधी ठेवायला हवी. अनाधिकृत बांधकामाचे पैसे घेतले जातातच पण सरकारी जागा हडपण्यासाठी खालच्या अधिकाऱ्याना पैसे दिले जातात. मंडळ अधिकारी, तहसिलदार, वन अधिकाऱ्यांना ९ बिल्डिंग ची ऑर्डर असताना मनिष जोशी कडुन कारवाई नाही. त्यानंतर ठाणे महापालिका कडुन ४३ बिल्डिंग अनाधिकृत असल्याचे अपिडेविड कोर्टात सहाय्यक आयुक्त फारुख शेख कडुन सादर केले गेले.

९ बिल्डिंगचे लाईट पाणी कपात केली असे कोर्टाला सांगितला आहे. खरंतर आजही त्यांना या सोयी पुरवल्या जात आहे. याचा पुरावा आहे. आमच्या कडे कोर्टाचा अपमान केला गेला.

मुलात लाईट पाणी कपात हे काही केलेच नाही. आज या विभागात केंद्र सरकार, महाराष्ट्र सरकार, एम आय डि सी वन विभाग आरक्षित भूखंडावर अनाधिकृत बांधकामे सरस चालू आहेत. हे आम्ही अधिकाऱ्यांना निदर्शनास आणून देत आहोत पण मांजरा सारखे अधिकारी दुध पित आहेत. डोळे मिटुन सहाय्यक आयुक्तांना मोहरा बनऊन मनिष जोशी, महेश आहेर सारखे अधिकारी अनाधिकृत बांधकामाना जबाबदार आहेत.

त्यामध्ये प्रशासकीय अधिकारी देखिल तितकेच जबाबदार आहेत. मुख्यमंत्र्यांच्या व हाय कोर्टाचा आदेश येथे पायदळी तुडवल जात. कारण येथे खायाचे वेगले आणि दाखवायचे दात वेगळे आहेत. सत्ताधाऱ्यांचे. कितेक वेळा अधिवेशनात अनाधिकृत बांधकामा बद्दल लक्षवेधी घेतल्या गेल्या आमदार संजय केळकर, आमदार प्रमोद (राजू दादा) पाटील, डॉ. जितेंद्र आव्हाड घेतल्या आहेत. आज शिळफाटा विभागात ५२ बिल्डिंग चा आदेश आहे. कारवाई करण्यासाठी पण मनिष जोशी सारखा भ्रष्ट अधिकारी कारवाई करताना दिसत नाही. फक्त या ५२ बिल्डिंगमुळे शासनाचा अदाजे १०० कोटी हुन अधिक महसुल बुडला गेला उद्या: रेरा परवाना महानगरपालिका बांधकाम परवाना, GST, आयकर, रॉयटी हे सरस डुबित जात आहे. या सर्वांस जबाबदार कोन आयुक्त, जिल्हाधिकारी आणि सत्ताधारी आहेत. बुलेट ट्रेन हि पंतप्रधान मोदीसाहेबाचे ड्रिम प्रोजेक्ट आहे त्याला लागून केंद्र सरकारची व महाराष्ट्र सरकारची जागा आहे. सातबारा असलेली, कोणताही परवाना नसताना तिथे अनाधिकृत बिंल्डीग उभी राहतात कशा! या करीता मुख्यमंत्री, मंडळ अधिकारी ते तहसिलदार, जिल्हाधिकारी, आयुक्त यांना लेखिपत्र देऊन सुद्धा कारवाई होत नाही. भविष्यात या बिल्डींग मुळे बुलेट ट्रेन ला मोठा धोका निर्माण होणार आहे. मग याला जबाबदार कोण असणार आहे. पुन्हा लख्खिकंपाऊंड होईल. यात मात्र शंका नाही. ३ ते ४ महिन्यात ८ ते ९ माळ्याचे बिल्डिंग निकृष्ट दर्जाच्या उभ्या केल्या जात आहेत. भविष्यात दुर्घटना जाल्यास यास जबाबदार ही सर्व मंडळी असणार. स्मार्ट सिटीच्या नावाने सत्ताधाऱ्यांच्या आशीर्वादाने ही अनाधिकृत ची स्मार्ट सिटी उभारली जात आहे. स्वताच्या नावावर असलेल्या ठाणे महापालिका आणि राज्य सरकारच्या आरक्षित भूखंडावर बेधडक अनाधिकृत बांधकामे केली जात आहे. आजही दिवा प्रभाग समिती कार्यालय भाडेतत्त्वावर, तलाठी कार्यालय भाडेतत्त्वावर आहेत. आरक्षित भूखंडावर अनाधिकृत बांधकामे राजकीय नेते आणि अधिकारामुळेच ही उभी राहतात. मुलात या सर्व अधिकाऱ्याची मालमतेची चौकशी केली पाहीजे. CBI चौकशी केली पाहीजे. या विभागात एकही आरक्षित भुखंड अनधिकृत बांधकामा वाचुन राहीला नाही.

शिळगावातील पोलीस पाटील संतोष भोईर, मनसे विभाग अध्यक्ष शरद पाटील, काँग्रेस महिला अध्यक्ष ठाणे वैशाली भोसले यांनी मीडियाच्या माध्यमातून सरकारला विनंती असेल आपल खरच भ्रष्टाचारी नसाल तर लवकरात लवकर आपण कारवाई करावी. आजवर झालेल्या MRTP देखिल तपासून पाहाव्यात आणि लख्खिकंपाउड हादसा मध्ये निष्पाप नागरिकांचा मृत्यू झालेल्याना लवकरात लवकर न्याय द्यावा. अधिकाऱ्यांवर देशद्रोहाचा गुन्हा नोंदविण्यात यावा.

# मेट्रोचा वेग वाढविण्याबाबत एम.एम.आर.डी.ए. च्या अधिकाऱ्यांशी चर्चा

## आमदार राजेश मोरे यांनी घेतली अधिकाऱ्यांची भेट

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.०६, कल्याण (ठाणे) :** कल्याण तळोजा मेट्रो १२ मार्गाचे काम मागील जवळपास वर्षभरापासून सुरू आहे. या मेट्रो मार्गात ज्या शेतकऱ्यांच्या जागा बाधित होत आहेत त्या शेतकऱ्यांना त्यांचा मोबदला मिळावा. ज्याद्वारे कामाचा वेग वाढवता येऊ शकेल. त्याचबरोबर या कामात काही अडथळे आहेत का आणि असल्यास ते कशाप्रकारे सोडवता येऊ शकतील. शिवाय ग्रामस्थांच्या जमिनी जात असताना तेथील गावपण कसे टिकवून ठेवता येईल. त्यांना सोयी सुविधा कशा पुरवता येतील. जेणेकरून तेथील ग्रामस्थ नाराज होणार नाहीत. याबाबत आमदार राजेश मोरे यांनी अधिकाऱ्यांशी एम.एम.आर.डी.ए च्या कार्यालयात भेट घेऊन चर्चा केली. दरम्यान शेतकऱ्यांना मोबदला देण्याबाबत एम.एम.आर.डी.ए कडून सकारात्मकता दर्शवण्यात आल्याने मेट्रो दृष्टिक्षेपात आल्याचा विश्वास आमदार मोरे यांनी व्यक्त केला आहे.

कल्याण डोंबिवली ते नवी मुंबई वाहतूक सुकर व्हावी यासाठी खासदार डॉक्टर श्रीकांत शिंदे यांच्या प्रयत्नातून कल्याण तळोजा मेट्रो १२ प्रस्तावित करण्यात आली असून या मार्गाचे काम वेगाने सुरू आहे. खासदार डॉक्टर शिंदे यांच्याकडून मेट्रो मार्गाच्या कामाचा वारंवार आढावा घेतला जात असला तरीही कल्याण ग्रामीणचे आमदार राजेश मोरे देखील सातत्याने या कामाबरोबरच कल्याण ग्रामीणच्या नागरिकांना कोणत्याही समस्या भेडसावू नये यासाठी पाठपुरावा करत आहेत. कल्याण तळोजा मेट्रो चा मार्ग कल्याण ग्रामीण मतदारसंघातून जात असून बाधित शेतकऱ्यांना जमिनीचा मोबदला मिळावा. यासाठी आमदार राजेश मोरे सातत्याने पाठपुरावा करत आहे. आज आमदार मोरे यांनी उपाध्यक्ष अविनाश मुदगल, अतिरिक्त आयुक्त पद्माकर रोकडे, प्रकल्प अधिकारी बसवराज यांच्याशी चर्चा करत या कामात कमी अडचणी आहेत का ? याची माहिती घेतानाच शेतकऱ्यांना त्यांचा मोबदला



वेळेत देण्याच्या सूचना केल्या तसेच हे काम कमीत कमी कालावधी पूर्ण करून लोकांना मेट्रो सफरीचा मार्ग खुला करून देण्याची मागणी ही त्यांनी केली. यावेळी त्यांचे सोबत डोंबिवली शहर सचिव तथा विधानसभा क्षेत्र प्रमुख संतोष चव्हाण आणि आमदार राजेश मोरे यांचे स्वीय सहाय्यक सतीश मोडक उपस्थित होते.

# स्वच्छते प्रमाणे नवी मुंबईला चढतोय सुंदरतेचा साज

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.०७, नवी मुंबई :** स्वच्छतेमध्ये आघाडीवर असणाऱ्या नवी मुंबई शहरात सुशोभिकरणाचे तितकेच महत्व दिले आहे. या अंतर्गत शहरातील मुख्य रस्त्यांच्या दुतर्फा तसेच वर्दळीच्या जागा, प्रमुख चौक, दर्शनी भाग अशा विविध ठिकाणी आकर्षक चित्रभिंती रंगवून, शिल्पाकृतींची नवरचना करून रस्ते दुभाजकांची रंगरंगोटी करुन शहराला सुंदरतेचा साज चढविला जात आहे.



महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली बेलापूर ते दिघा अशा ८ ही विभागांमध्ये लक्षवेधी रंगसंगती द्वारे चित्र भिंती सजविल्या जात आहेत. त्यावर विविध जनजागृतीपर संदेश सुलेखनाद्वारे रेखाटून स्वच्छता, पर्यावरण, आरोग्य, शिक्षण याविषयी जागरुकता निर्माण केली जात आहे. यामध्ये ज्याठिकाणी यापूर्वी काढलेली चित्रे सुस्थितीत आहेत त्यावर पाणी मारुन ती धुवून घेतली जात आहेत. विशेष म्हणजे ती धुण्यासाठी पिण्याच्या पाण्याच्या ऐवजी प्रक्रीयाकृत पाण्याचा वापर केला जात आहे. विशेषत्वाने शहरातील मुख्यरस्ते व वर्दळीची ठिकाणे येथे मोठया प्रमाणात लोकांची रहदारी असल्याने अशा ठिकाणच्या सुशोभिकरण यावर विशेष भर देण्यात येत आहे. त्याचप्रमाणे रस्त्यांशेजारील पदपथांचे कर्बस्टोन आणि दुभाजकांचे कर्बस्टोन यांची ही वाहतूक नियमानुसार पिवळया-काळया रंगात रंगरंगोटी केली जात आहे.

नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात ठिकठिकाणी चौकांमध्ये बसविण्यात आलेल्या आकर्षक शिल्पाकृतींची डागडुजी करण्यात येत असून आवश्यक तेथे शिल्पांना रंगरंगोटी ही करण्यात येत आहे. या शिल्पाकृतींमधील अनेक शिल्पाकृती ह्य टाकाऊ पासून टिकाऊ संकल्पनेनुसार बनविण्यात आल्या असून त्या ही सुव्यवस्थित करुन घेण्यात येत आहेत. तसेच दिशादर्शक फलकांचीही दुरुस्ती केली जात आहे. चौकांमधील कारंज्याचीही आवश्यकतेप्रमाणे दुरुस्ती करण्यात येत असून त्यासाठी वापरले जाणारे प्रक्रीयाकृत पाणी नियमीत सुरु राहील याची ही काळजी घेतली जात आहे. नागरिकांनी आपल्याकडील नको असलेल्या वस्तू द्याव्यात व ज्यांना अशा वस्तूंची गरज आहे त्यांनी त्या तेथून घ्याव्यात याकरिता नवी मुंबईत ९२ ठिकाणी थ्री आर सेंटर्स उभारण्यात आले असून त्याला नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. मानवतेचे देणे-घेणे या संकल्पनेनुसार ९२ इतक्या मोठया संख्येने सुरु असलेल्या या थ्री आर सेंटर्सची आवश्यकतेनुसार दुरुस्ती व पुनर्रचना करण्यात येत आहे.

अशा प्रकारे स्वच्छतेप्रमाणेच शहर सुशोभिकरणाकडे विशेष लक्ष दिले जात असून विविध रंगसंगतीने सजलेले नवी मुंबई शहर आता अधिकच सुंदर दिसू लागल्याने नवी मुंबईकर नागरिकांप्रमाणेच शहरात विविध कामांसाठी येणाऱ्या प्रवाशांकडून व पर्यटकांकडूनही समाधान व्यक्त केले जात आहे.

# कळंब येथे गायरान अतिक्रमण धारकांची जनसंसद व मराठवाडा स्तरीय बैठकीचे आयोजन

**अक्षराज : अशोक कुलकर्णी**

**दि.०७, कळंब (धाराशिव) :** कळंब येथे संविधानातील न्याय, स्वातंत्र्य, समानता, बंधुता या मूल्यांच्या आधारित गायरान अतिक्रमण धारक जनसंसद व मराठवाडा स्तरीय बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. ८ मार्च महिला हक्क दिनानिमित्त व महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळावर मोर्चाच्या आयोजना निमित्त ही बैठक आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीमध्ये हवामान बदलाचे होणारे परिणाम, निवासी अतिक्रमणे नावे करा, गायरान जमीन अतिक्रमण




नावे करा आदी विषयावर या बैठकीत चर्चा होणार आहे. सदरील बैठक पंचायत समिती कार्यालय कळंब येथील सभागृहात दि.८ मार्च २०२५ रोजी सकाळी १२ते ०२ या वेळेत होणार असुन या बैठकीसाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून अप्पाराव मोरताटे (संस्थापक अध्यक्ष) गायरान मोर्चा परभणी, नागनाथ चव्हाण (संस्थापक अध्यक्ष) वंचित हक्क आंदोलन,अशोक पालके (संस्थापक अध्यक्ष) युवा आंदोलन संघटना आंबेजोगाई, राजेश घोडे (संस्थापक अध्यक्ष) आझाद क्रांती सेना, धम्मपाल कांडेकर (संस्थापक अध्यक्ष) युवा प्रदेशाध्यक्ष पँथर्स रिपब्लिकन पार्टी बीड, विश्वनाथ गवारे जमीन अधिकार आंदोलन परभणी, बायजाबाई घोडे जमीन अधिकार आंदोलन परभणी, जगदीश कुमार इंगळे विदर्भ बिगर सातबारा संघटना, संदिपान जोगदंड दलित हक्क आंदोलन, रामभाऊ लगाडे जिल्हाध्यक्ष जानिव संघटना, राम शेंडगे (संस्थापक अध्यक्ष)बहुजन अधिकार आंदोलन, श्रावण क्षीरसागर (ज्येष्ठ साहित्यिक)वाशी तालुका आदी उपस्थित राहणार आहेत. सदरील कार्यक्रमाचे आयोजन भाई बजरंग भाऊ ताटे (संस्थापक अध्यक्ष) श्रमिक मानवाधिकार संघ व सचिव माया शिंदे यांनी केले आहे. तरी मराठवाड्यातील व धाराशिव जिल्ह्यातील गायरान धारकांनी मोठ्या संख्येने कार्यक्रमाला उपस्थित राहावे असे आवाहन करण्यात आले आहे.

# धारावी पुनर्विकास प्रकल्प टेंडर प्रकरणी सुप्रीम कोर्टाने महाराष्ट्र सरकारला नोटीस; २५ मे रोजी पुढील सुनावणी

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०७, नवी दिल्ली :** सुप्रीम कोर्टाने आज सेकलिंक टेक्नॉलॉजीजच्या याचिकेवर महाराष्ट्र सरकारला नोटीस बजावली असून, धारावी झोपडपट्टी पुनर्विकास प्रकल्पाच्या टेंडर संदर्भात २५ मे २०२५ रोजी पुढील सुनावणी होणार आहे.

मुख्य न्यायाधीश संजीव खन्ना आणि न्यायमूर्ती संजय कुमार यांच्या खंडपीठाने मुंबई उच्च न्यायालयाच्या त्या निर्णयाविरुद्ध ही नोटीस काढली, ज्यामध्ये सेकलिंक टेक्नॉलॉजीजचा टेंडर रद्द करण्याचा आणि अडाणी प्रॉपर्टीजला नवीन टेंडर देण्याचा महाराष्ट्र सरकारचा निर्णय योग्य ठरवण्यात आला होता. २०१८ मध्ये महाराष्ट्र सरकारने धारावी पुनर्विकास प्रकल्पासाठी टेंडर काढले होते. यात सेकलिंक टेक्नॉलॉजीजने ७२०० कोटी रुपयांची बोली लावली होती, तर अडाणी प्रॉपर्टीजने ४५२९



कोटींची बोली लावली होती. मात्र, सरकारने २०२० मध्ये टेंडर रद्द करून २०२२ मध्ये नव्या अटींसह पुन्हा टेंडर काढले. या नव्या टेंडरमध्ये ४५ एकर रेल्वे जमीन समाविष्ट करण्यात आली आणि अडाणी प्रॉपर्टीजने ५०६९ कोटी रुपयांची बोली लावली. त्यामुळे सेकलिंक टेक्नॉलॉजीजने सरकारवर पक्षपातीपणाचा आरोप करत उच्च न्यायालयात धाव घेतली. मात्र, उच्च न्यायालयाने सरकारचा निर्णय योग्य ठरवत सेकलिंकची याचिका फेटाळली.

सुप्रीम कोर्टाने याचिकेवरील प्राथमिक सुनावणीत सरकारला नोटीस बजावली आणि स्पष्ट केले की, टेंडर प्रक्रियेतील आर्थिक व्यवहार केवळ एस्क्रो खात्यातूनच होतील. कोर्टाने असेही सांगितले की, अडाणी प्रॉपर्टीजकडून देयक फक्त एका बँक खात्यातूनच होईल आणि सर्व व्यवहारांचे योग्य प्रमाणपत्र आणि बिलिंग ठेवले जाईल. सेकलिंकच्या वकिलांनी कोर्टात सांगितले की, कंपनी ८६४० कोटी रुपयांची सुधारित बोली लावण्यास तयार आहे, जी अडाणीच्या ५०६९ कोटी रुपयांच्या बोलीपेक्षा मोठी आहे. तसेच, त्यांनी अटी आणि जबाबदाऱ्या स्वीकारण्याची तयारीही दर्शवली.

मात्र, महाराष्ट्र सरकारच्या वतीने सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी कोर्टात सांगितले की, नवीन टेंडरच्या अटींनुसार विकास योजना सुरू झाली असून, रेल्वे क्वार्टर्सदेखील पाडण्यात आले आहेत.

सुप्रीम कोर्टाने दोन्ही बाजूंनी मांडलेले मुद्दे ऐकून घेतले असून, २५ मे २०२५ रोजी पुढील सुनावणी ठेवली आहे. दरम्यान, न्यायालयाने स्पष्ट केले आहे की, या प्रकरणात कोणतीही बाजू 'विशेष हक्क' सांगू शकणार नाही.

# विद्यार्थी बनले शिक्षक !

## विद्यार्थ्यांचा घेण्यात आला स्वयंशासन दिन...



**अक्षराज : संगीता वनकळस**

**दि.०७, कळंब (धाराशिव) :** जि. प. प्रा. शाळा सारोळा मां. येथे इ.सातवीच्या विद्यार्थ्यांचा स्वयंशासन दिन घेण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून आजच्या स्वयंशासन दिनाच्या मुख्याध्यापिका संबोधी संभाजी शिंदे तर प्रमुख पाहुणे म्हणून उप मुख्याध्यापिका नांगरे आकांक्षा अलौकिक, तसेच शाळेचे मुख्याध्यापक अंकुश कोकणे सर, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष संभाजी शिंदे, भागवत मोरे उपस्थित होते. याच कार्यक्रमामध्ये मुख्यमंत्री युवा प्रशिक्षणार्थी मुळे सोनाली अमोल यांनी त्यांचा सहा महिन्याचा कालावधी पूर्ण केल्याबद्दल त्यांचा सत्कार करून त्यांनाही यावेळी निरोप देण्यात आला. इ. ७वीच्या २६ विद्यार्थ्यांनी दिवसभर शिक्षकांची भूमिका बजावून इ.१ ली ते ६ वीच्या विद्यार्थ्यांना अध्यापन केले व अध्यापनाचा अनुभव घेतला. स्वयंशासनदिना निमित्त आज सर्व मुलांना लाडू, पुरी, भाजी व पुलाव याची मेजवानी देण्यात आली. कार्यक्रमाप्रसंगी संभाजी शिंदे, ईश्वर शिंदे, संतोष पाचपिंडे, राजकुमार गुंजाळ, सोनाली मुळे यांनी आपले विचार व्यक्त केले. तसेच आजचे ७वीचे शिक्षक व शिक्षिका यांनीही आपले विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतराम शेवाळे यांनी तर आभार प्रदर्शन संतोष झांबरे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक अंकुश कोकणे, राजकुमार गुंजाळ, दत्तात्रय दळवे ईश्वर शिंदे सर, संतोष झांबरे, संतोष पाचपिंडे, संतराम शेवाळे, शुभांगी गायकवाड व युवा प्रशिक्षणार्थी सोनाली मुळे यांनी परिश्रम घेतले. तसेच स्वयंपाकी व मदतनीस रतन राऊत मावशी, राणीताई मोरे व सिंधू काशीद मावशी यांनीही स्वयंपाकासाठी खूप परिश्रम घेतले.

# हनुमान नगरात बिबट्याचा थैमान; नागरिक भयभीत

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.७, विंचूर (नाशिक) :** नाशिक- छत्रपती संभाजीनगर रोडवरील विंचूर पासून जवळच असलेले हनुमान नगर येथे पुनश्च बिबट्याने रात्रीच्या वेळेस भास्कर गुंजाळ यांच्या वस्तीवरील शेळीवर हल्ला केला. गेल्या महिनाभरापासून हनुमान नगर परिसरात बिबट्या थैमान घालत आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये भीतीच वातावरण तयार झाले आहे. तर शेतकऱ्यांना लोड शेडिंग मुळे दिवसा लाईट बंद असते आणि रात्री लाईट चालू असते या बिबट्याच्या धुमाकूळी मुळे यांना रात्री पिकांना पाणी भरणे अशक्य झाले आहे. हनुमान नगर मधली महिनाभरात ही दुसरी घटना घडली आहे.

हनुमाननगर परिसरामध्ये रात्रीचे चार दिवस वीज पुरवठा असतो तर दिवसाचे तीन दिवस असल्याने शेती पिकांना या उन्हाळ्याच्या दिवसामुळे जास्त पाणी लागत असल्याने वेळेवर शेतीला पाणी देणे शक्य होत नाही. महावितरणने सहकार्य करावे अशी मागणी शेतकरी करीत आहे. रात्रीच्या वेळेस बिबट्याच्या भीतीने वावरात जाता येत नाही. त्यामुळे शेतीला रात्रीचे पाणी देणे शक्य नाही. आणि पाळीव प्राणी सांभाळणे ही अवघड झाले आहे.

**- ज्ञानेश्वर भडांगे, हनुमान नगर**

# ७ वर्षांच्या नुरोदिन शेख यांचा पाहिला रोजा, सर्वत्र कौतुक

**अक्षराज : जयराम देमगुंडे**

**दि.०७, उदगीर (लातूर) :** उदगीर तालुक्यातील वाढवणा बुद्रुक येथील ७ वर्षाचा मुलगा नुरोदिन हुकूमत शेख याने आपल्या जिवनातील पाहिला रोजा राहून सर्वं परिवाराला आश्चर्य चकित केले. पहाटे सकाळी रोजा राहतो म्हणुन जिद्द केला व सहेरी केली. १४ तास निरंक उन्हात रोजा पूर्ण केल्यामुळे वडील वार्ताहर हुकूमत शेख यांनी आपल्या लाडक्या मुलास नवीन पोशाख व हार घालुन रोजा इफ्तार साठी मेवा फ्रुट खजूर व थंड पेय पाजून नुरोदिन शेख याचा रोजा खोलला. ७ वर्षांचा नुरोदिन हुकूमत शेख कडक उन्हाळ्यात देखील जीवाची पर्वा न करता अल्ला ला राजी करण्यासाठी रोजा पूर्ण केल्यामुळे गल्ली मोहल्ला व गावातून नुरोदिन शेख चे कौतुक होत आहे.

# अर्थसंकल्पीय अधिवेशनात माढा मतदार संघाच्या समस्यांकडे आ.पाटील यांनी वेधले लक्ष

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.०७, पंढरपूर :** माढा विधानसभा मतदारसंघाचे नूतन आमदार अभिजीत पाटील यांनी मतदार संघातील अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या प्रश्नांकडे लक्ष वेधून घेत हिवाळी अधिवेशनानंतर पार पडत असलेल्या विधानसभा अर्थसंकल्पीय अधिवेशनातही मतदार संघाच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वपूर्ण मागण्या केल्या.

सध्या उन्हाचा कडाका वाढत चालल्याने पाण्याचा प्रश्न भेडसावू नये यासाठी माढा तालुक्यातील पाणीप्रश्न सोडवण्यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात, माढा तालुक्यातील नागरिकांना दर १० ते १२ दिवसांतून एकदा पाणीपुरवठा केला जातो या संदर्भात तातडीने उपाययोजना कराव्यात. आष्टी तलाव व दारफळ-सीना माढा प्रकल्प या दोन्ही स्त्रोतांचा समन्वय करून माढा शहर व तालुक्याला कायमस्वरूपी पाणीपुरवठा करावा. यासाठी आवश्यक पाणीपुरवठा योजनांना तात्काळ मंजुरी मिळावी व निधी उपलब्ध करून द्यावा. माढा तालुक्यात नवीन पोलीस स्टेशन आणि उपविभागीय पोलीस कार्यालय स्थापन करावे. माढा तालुक्यात सध्या माढा, कुर्डूवाडी आणि टेंभुर्णी ही तीन पोलीस ठाणी कार्यरत आहेत. मात्र मोडनिंब पोलीस स्टेशनचा प्रस्ताव अद्याप प्रलंबित आहे. त्यामुळे तो तातडीने मंजूर करून या परिसरातील कायदा-सुव्यवस्था मजबूत करावी.

सध्या माढा तालुक्याचा काही भाग बार्शी व करमाळा या ठिकाणी जोडला जातो. त्यामुळे स्थानिक नागरिकांची गैरसोय होते. यासाठी माढा येथे कार्यालय आणि स्वतंत्र युनिट स्थापन करावे.

टेंभुर्णी पोलीस ठाण्यासाठी नवीन इमारतीची गरज आहे. या ठिकाणी ५ एकर जागा उपलब्ध असून त्याचा वापर आदर्श पोलीस स्टेशन उभारण्यासाठी करावा. तसेच पोलीस वसाहत, वरिष्ठ अधिकाऱ्यांसाठी निवासस्थान आणि आधुनिक सुविधा असलेले पोलीस स्टेशन यासाठी निधी मंजूर करावा. याचबरोबर माढा व पंढरपूर परिसरातील ऐतिहासिक व धार्मिक स्थळांचे सुशोभीकरण करावे, यामध्ये भुईकोट किल्ला, माढा येथील छत्रपती शिवरायांचे जावई निंबाळकर यांच्या समाधीचे सुशोभीकरण करण्यासाठी निधी मंजूर करावा.

मनकर्णिका नदीचे सुशोभीकरण करणे आवश्यक आहे. नगर विकास खात्यामार्फत या नदीला कॅनॉलचा दर्जा मिळावा आणि तिचा विकास करण्यात यावा. या मागण्यासाठी विधानसभा अर्थसंकल्पीय अधिवेशनात आमदार अभिजीत पाटील यांनी आवाज उठून लक्ष वेधून घेतल्याने लवकरच यासाठी निधी मिळेल अशी अपेक्षा निर्माण झाली आहे.

# थोडक्यात

## बळीराज सेनेचे सरचिटणीस नंदकुमार मोहिते यांचे दुःखद निधन



**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.०६, मुंबई :** बळीराज सेनेचे सरचिटणीस, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले इंग्लिश मीडियम स्कुल, श्रमिक विद्यालय व लोकनेते शामराव पेजे कनिष्ठ महाविद्यालय संस्थापक/अध्यक्ष नंदकुमार मोहिते यांचे गुरुवार, दिनांक ०६ मार्च २०२५ रोजी हृदय विकार झटक्याने मुंबईतील नायर हॉस्पीटल येथे उपचारादरम्यान दुःखद निधन झाले. समाजाप्रति प्रचंड आत्मीयता असणारे, साधी राहणीमान, उच्च विचारसरणी असलेले कुणबी समाजातील एक अभ्यासू व्यक्तिमत्त्व, निर्भीड वक्ता म्हणून नंदकुमार मोहिते हे समाजपटलावर आदर्श स्थानी होते. कोकणात पिढ्यानपिढ्या कुणबी समाज कसत असलेल्या कुळांच्या जमनी मूळ शेतकऱ्यांच्या नावे व्हाव्यात यासाठी त्यांनी गेली ४ दशके लढा दिला. सलग १५ वर्षे सरपंच, काही वर्षे ते रत्नागिरी जिल्हा परिषद सदस्य म्हणून निवडून गेले होते. शिक्षण क्षेत्रात त्यांचे योगदान अतुलनीय असे होते. अनेक गरीब मुलांना शिक्षण प्रवाहात आणण्यासाठी त्यांनी अहोरात्र मेहनत घेतली. आज त्यांच्या या शैक्षणिक चळवळीने अनेक गरीब कुटुंब सुखी समाधानाचे जीवन जगत आहेत. त्यांच्या निधनाने सामाजिक, राजकीय, शैक्षणिक पटलावर मोठी न भरून येणारी पोकळी निर्माण झाली असून स्व.नंदकुमार मोहिते यांच्याप्रति बळीराज सेने सह विविध क्षेत्रातून भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात येत आहे.

## रविवारी अहिल्यानगरध्ये खासदार मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन




**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०६, अहिल्यानगर :** शेतकरी बांधवांचे हक्क आणि परवडणाऱ्या आरोग्यासाठी जनजागृती करण्यासाठी खासदार नीलेश लंके यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून अहिल्यानगर शहरात रविवार, दिनांक ०९ मार्च २०२५ रोजी सकाळी ६ वाजता खासदार मॅरेथॉनचे आयोजन करण्यात आले आहे. नीलेश लंके प्रतिष्ठानच्या वतीने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. ५ किमी आणि १० किलोमीटर अंतराच्या या मॅरेथॉनचे आयोजन करण्यात आले असून त्यासाठी नोंदणी बंधनकारक आहे. तर २.५ किमी वॉकाथॉनसाठी कोणतीही नोंदणी आवष्यक नसल्याचे सांगण्यात आले. नगर-कल्याण महामार्गावरील द्वारका लॉन्स येथून मॅरेथॉनला प्रारंभ होणार असून केडगांव बायपास मार्गे पुन्हा द्वारका लॉन्स येथे मॅरेथॉनची सांगता होईल. ५ किमी आणि १० किमीच्या या स्पर्धेत १२ वर्षावरील पुरूष आणि महिला सहभागी होऊ शकतात. याशिवाय महिला व १२ वर्षांखालील मुले आणि ज्येष्ठ नागरीकांसाठी २.५ किमी वॉकथॉनचे आयोजन करण्यात आले आहे. मॅरेथॉन स्पर्धे बरोबर शेतकऱ्यांच्या हक्कासाठी आणि सर्वसामान्य नागरिकांसाठी दर्जेदार व परवडणाऱ्या आरोग्य सेवांसाठी ही चळवळ आहे. त्यामुळे अहिल्यानगर शहरातील नागरीकांनी या सामाजिक उपक्रमात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन निलेश लंके प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आले आहे.

## 'बेटी बचाव बेटी पढाव' अंतर्गत शहरात आज वॉकेथॉन

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०६, अकोला :** 'बेटी बचाव बेटी पढाव' उपक्रम तसेच जागतिक महिला दिनानिमित्त महिला सुरक्षितता हा विषय घेऊन शहरात शुक्रवार, दिनांक ०७ मार्च २०२५ रोजी वॉकेथॉनचे आयोजन करण्यात आले आहे. विविध मान्यवर व महिलाभगिनी, तसेच नागरिकांच्या सहभागासह शुक्रवारी दु. ४ वा. जिल्हा परिषदेपासून ते हुतात्मा स्मारकापर्यंत वॉकेथॉनचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्हाधिकारी अजित कुंभार यांच्या हस्ते मुख्य कार्यकारी अधिकारी बी.वैष्णवी व जिल्हा पोलीस अधीक्षक बच्चन सिंह यांच्या उपस्थितीत हिरवी झेंडी दाखवुन शुभारंभ होईल. महिलांनी या वॉकेथॉनमध्ये सहभागी होण्याचे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी गिरीश पुसदकर व महिला व बालकल्याण अधिकारी राजश्री कौलखेडे यांनी केले आहे.

## विष्णू धनावडे यांची घणसोली वॉर्ड ऑफिसर पदी वर्णी

### मायभूमी जावलीच्या शिरपेचात मानाचा तुरा



**अक्षराज : विकास दळवी**

**दि.०७, ठाणे :** नवी मुंबई महापालिका एफ विभागाचेवॉर्ड ऑफिसर म्हणून विष्णू धनावडे यांची वर्णी लागली असून पालिका आयुक्त कैलास शिंदे यांनी कार्यादेश काढून तत्काळ कार्यभार स्विकारण्याच्या सूचना केल्या आहेत. या ठिकाणी सहाय्यक आयुक्त संजय तायडे हे नुकतेच सेवानिवृत्त झाल्याने अधिक्षक वसुली अधिकारी असलेले विष्णू धनावडे यांची घणसोली एफ विभागाचे विभाग अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. जावली तालुक्यातील मामुर्डी गावचे मूळ रहिवासी असलेले विष्णू धनावडे नवी मुंबई पालिकेत एक कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून गणले जातात.

विभाग अधिकारी म्हणून त्यांना मिळालेली संधी ही जावलीच्या गौरवशाली परंपरेच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवणारी आहे. नवी मुंबई पालिकेच्या सेवेबरोबरच विष्णू धनावडे यांनी आपली कारकिर्द एक सामाजिकतेचा सेतू उभारण्यासाठी ही कामी लावली आहे. त्यामुळे कर्तव्यदक्ष अधिकारी बरोबरच एक संवेदनशील माणूस म्हणूनही त्यांनी जनमानसात आपले स्थान निर्माण केले आहे.नवी मुंबई व जावलीकरांमध्ये धनावडे यांच्या नियुक्तीमुळे उत्साहाचे वातावरण असून त्यांच्यावर अभिनंदन व शुभेच्छाचा वर्षाव होताना दिसत आहे.